**नि.फौ.ख.क्र.९५७/२०२२.**

**निशाणी क्र.२०/क लगत.**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा उर्वरित सरतपास घेणार सरकारी वकिल श्रीमती एस.व्ही.पवार यांच्या मार्फत शपथेवर सुरु...**

०३. आता मला जप्त मुद्देमाल ब्लाऊज दाखविण्यात आला. फिर्यादीने तो ब्लाऊज ओळखला. तो त्यांच्याच असल्याचे कथन केले. घटना घडली त्या दिवशी फिर्यादी यांनी तो ब्लाऊज अंगात घातला होता. म्हणुन पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केला. म्हणुन त्यास अर्टिकल 'ब' देण्यात येत आहे. तो ब्लाऊज फाटलेला आहे. आरोपीने त्यांना मारहाण करताना तो फाटला आहे.

**सरतपास पुर्ण...**

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.जी.के. नाईक यांच्यामार्फत उलट तपास शपथेवर सुरु....**

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कृष्णात पाटील राहत असलेले गल्ली सोडून मी मागच्या गल्लीत राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरी जात असताना कृष्णात पाटील यांच्या घरासमोरुन जाऊन पुढे बोळामध्ये टर्न घ्यावा लागतो त्यानंतर मुख्य रस्त्यास येऊन, एक वळण घेऊन माझ्या घरी जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, तिकटे नावाची महिला गायकवाड यांच्या घरात भाडयाने राहत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरा – समोरुन पुर्व–पश्चिम चालीचा वीस फुटी रस्ता मुख्य रस्त्यास जाऊन मिळतो. तो रस्ता पश्चिमकडे शेतात जाऊन थांबतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा गोठा उत्तरेकडील रस्त्यास आहे. कृष्णात पाटील यांच्या घरापासुन शंभर ते दीडशे फुट अंतरावर सरळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गोठयाच्या शेजारी सुनिल सात्ताप्पा पाटील यांची रिकामी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराच्या रस्त्याच्या पलीकडे त्यांच्या चुलत्यांची जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कृष्णात पाटील यांच्या घराच्या समोरची जमीन ही बंडा पाटील यांची

आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, बंडा पाटील यांच्या जमिनीत दोन प्लॉटपैकी एका प्लॉटमध्ये घर बांधलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गोठयाच्यासमोर संदीप पाटील हे राहतात. त्यांच्या शेजारी बायक्का राहतात. त्या दोघांच्यामध्ये तायनाबाई (तायना दत्ता पवार) राहतात. हे म्हणणे खरे आहे की, पुर्व–पश्चिम रस्त्याच्या दक्षिण बाजुस आरोपीचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराच्या पश्चिम बाजुस आरोपीचे दोन भाऊ राहतात. हे म्हणणे खरे आहे की, सुजाता बळीराम पाटील यांचा जनावारांचा गोठा आरोपीच्या घराचा समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दत्ता पाटील यांचे घर आरोपीच्या घराशेजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दत्ता पाटील यांच्या घरासमोर सुजाता पाटील यांचा गोठा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दत्ता पाटील यांच्या घराशेजारी त्यांचे आई वडील राहतात. हे म्हणणे खरे आहे की, पश्चिम बाजुला एकदम शेवटी आरोपीचा जनावाराचा गोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराच्या पुर्वेला काशिद लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संदिप पाटील यांचे घर दोन मजली आहे. हे म्हणणे खरे आहे की, संदिप पाटील यांच्या दुस–या मजल्यावर सी.सी.टी.व्ही. बसविला आहे. हे म्हणणे खरे आहे की, संदिप पाटील यांच्या दुस–या मजल्यावरील सी.सी.टी.व्ही. हे येणा–या जाणा–यांची हालचाल नोंदविते, रेकॉर्ड करते.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, दोन वर्षांपुर्वी आरोपी गावातील महिलांची बिशी चालवत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देतेवेळेस आरोपी मला रक्कम रु.१,११,०००/– देणे लागत होते याबाबत मी काही कथन केले नाही, पोलीसांना सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला रक्कम रु.५,००,०००/– व्याजाने दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, गेल्या दोन वर्षापुर्वीपासुन आरोपीने मला व्याज दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडुन व्याजाव्यतिरिक्त दंड व्याज म्हणुन दीड लाख रुपयांची मागणी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझे पती व मुले आरोपीस त्रास

देत होते. (फिर्यादी यांचा आज रोजी नोंदविण्यात आलेला आतापर्यंतच्या पुराव्याच्यावेळेस फिर्यादी यांचे पती न्यायालय कक्षेमध्ये हजर होते. त्यांची साक्ष भविष्यात नोंदविण्याची असल्याने त्यांना न्यायालय कक्षेबाहेर बसण्याबाबत सांगण्यात आले. ) हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे दंड व्याजाची रक्कम देत नसल्याने मी भांडणाचा प्रसंग तयार करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सुजाता बळीराम पाटील या माझ्या चुलत जाऊबाई आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना फोन करुन सांगितल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सुजाता बळीराम पाटील हिला कोणत्या नंबरवरुन, कोणत्या नंबरला फोन केला ते फोन नंबर फिर्यादीमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे सुजाता पाटील हिला फोन केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ''तुमचे कुत्रे आमच्या जनावरांच्या वैरणीवर घाण करते'' असे कोणतेही सुजाता पाटील यांचे कुत्रे नाही. हे म्हणणे खरे नाही की, सुजाता पाटील यांचे कुत्रे व मी फिर्यादीमध्ये नमुद केलेली बाब ही काल्पनिक स्वरुपाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, काहीतरी खुरापट काढायची म्हणुन कुत्र्याची बाब मी मध्ये आणली आहे.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, कृष्णात पाटील यांच्या गोठयात जायचे असल्यास माझ्या गोठयापासुन सरळ जाऊन आरोपीच्या घराजवळ वळण घेऊन पुढे गेले असता शेवटी आरोपीचा गोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी, दत्ता पाटील, साताप्पा पाटील इ. शेजारी शेजारी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या गोठयापासुन शंभर मीटरच्या वळणाच्या रस्त्यानंतर माझे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुजाता बळीराम पाटील या गावात राहतात. हे म्हणणे खरे नाही की, पांडुरंग खिटे हे माझ्या घराशेजारी राहायला आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरची घटना ही संध्या.०७.०० ते ०७.३० वाजता घडली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे शिक्षक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली त्यावेळेस आरोपी हे गावात शिकवायला नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, शाळेचा सर्व व्यवहार,

दफ्तर बंद करुन आरोपीस परत येण्यास सायं.०६.३० ते ०७.०० वाजत होते. हे म्हणणे खरे आहे की, पैसे मागण्याकरिता मी आरोपीच्या घरी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, पैश्याच्या व्यवहारावरुन आरोपीच्या पत्नीशी माझी बराच वेळा वादावाद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा, पांडुरंग खिटे, गावातील बराच लोकांचा व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, जितेंद्र मगदुम यांनी माझ्यावर सावकारीची केस केली. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याबाबत पोलीस ठाण्याला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दि.१२/०२/२०२२ रोजीच्या फिर्यादी जबाबामधील परि.क्र.०३ मधील ६वी ओळ ते नवव्या ओळीपर्यंतचे केलेले कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वर्दी जबाबात माझे मंगळसुत्र पडले नंतर ते मिळाले असे सदरची केस खरी असल्याचे भासविण्याकरिता खोटे कथन केले आहे.

**उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब...**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Date: 2025.03.07 17:27:52 +0530

(श्रीमती एम.एस.मनगुळी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.६, कोल्हापुर.

दि.०७/०३/२०२५.